लोकमत

# भारत-जपानमधील सहसंबंध ज्ञानाधारित असावेत : सहस्रबुद्धे

## शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषद

कोल्हापूर : भारत-जपानमधील सहसंबंध ज्ञानाधारित असावेत. त्याद्वारे दोन्ही देशांमध्ये प्रगतीच्या संधी निर्माण होतील, असा विश्वास भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी शुक्रवारी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठात आयोजित १३ व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेचे डॉ. सहस्रबुद्धे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. जी. डी. यादव, जपानचे मुंबईतील कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहारी यासुकाता, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, जपानच्या 'ल्युपेक्स' या चांद्रयान मोहिमेसाठी जपानी अवकाश संस्थेशी इस्रोने सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. असे ज्ञानसंबंध यापुढील काळात अधिक दृढ होण्याच्या दृष्टीने ही परिषद अमूल्य भूमिका बजावेल.

डॉ. यासुकाता म्हणाले, उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने जपानी कंपन्यांना भारतात मोठा रस असून भारतात जपानी गुंतवणुकीचा ओघ मोठ्या प्रमाणात येऊ लागेल.

डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाने जपानमधील दहाहून अधिक शैक्षणिक संस्था व विद्यापीठांसमवेत शैक्षणिक व संशोधनपर सहकार्य संबंध प्रस्थापित केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी सादळे यांनी आभार मानले. इंडियन जेएसपीएस अल्युम्नाय असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. डी. शक्तिकुमार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार उपस्थित होते. दरम्यान, परिषदेमध्ये आज, शनिवारी सकाळी ११ वाजता शालेय विद्यार्थ्यांसाठी 'इग्नाइटिंग माइंड्स ऑफ चिल्ड्रेन' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.




शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी डॉ. विनय सहस्रबुद्धे व डॉ. फुकाहारी यासुकाता यांच्या हस्ते विज्ञान तंत्रज्ञान परिषदेचे उद्घाटन झाले. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, प्रा. डी. शक्तिकुमार, डॉ. जी. डी. यादव, डॉ. सरिता ठकार, डॉ. शिवाजी सादळे उपस्थित होते.

### 'बुद्धाचा ज्ञानसंदेश आत्मसात करा'

भगवान बुद्ध हा 'अत्त दीप भव' असा संदेश घेऊन जपानसह जगभर पसरला. त्याखेरीज भारत 'तमसो मा ज्योतिर्गमय' हा संदेश देत आला. हे दोन्ही संदेश ज्ञानाशी निगडित आहेत. समूहशक्तीने विज्ञानाचा व ज्ञानाचा अंगीकार केल्यास प्रगतीच्या वाटा सर्वदूर निर्माण होतात. बुद्धाचा हा ज्ञानसंदेश आत्मसात करण्याचे आवाहनही डॉ. सहस्रबुद्धे यांनी केले.

- 9 SEP 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## डॉ. विनय सहस्रबुद्धे : विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेला प्रारंभ

# स्वतःची ओळख घेऊन भारताने पुढे यावे

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : 'स्वतःची ओळख घेऊन जपान उभा राहिला, म्हणून तो देश जगाच्या पाठीवर स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करू शकला. ही बाब भारतालाही लागू आहे. भारतानेही स्वतःची ओळख घेऊन उभा राहणे आवश्यक आहे. त्यासाठी जपानकडून निश्चितपणे प्रेरणा घ्यावी', असे असे प्रतिपादन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित १३व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दिगंबर शिर्के, तर ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जी. डी. यादव, जपानचे मुंबईतील कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहारी यासुकाता प्रमुख उपस्थित होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी १३ व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे आणि जपानचे मुंबईतील कॉन्सूल जनरल डॉ.फुकाहारी यासुकाता यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी डावीकडून डॉ. प्रमोद पाटील, डी. शक्तिकुमार, जी.डी. यादव, दिगंबर शिर्के, सरिता ठकार, शिवाजी सादळे उपस्थित होते.

डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, 'भारत आणि जपान या उभय देशांमधील सहसंबंध हे ज्ञानाधारित असावेत. त्याद्वारे दोन्ही देशांमध्ये प्रगतीच्या अनेकविध संधी निर्माण होतील. भगवान बुद्ध यांनी 'संघं शरणं गच्छामि' संदेश दिला आहे. समूहशक्तीने विज्ञानाचा, ज्ञानाचा अंगीकार केल्यास प्रगतीच्या वाटा सर्वदूर निर्माण होतात. हा ज्ञानसंदेश आत्मसात करावा.'

डॉ. यासुकाता म्हणाले, 'उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने जपानी कंपन्यांना भारतात मोठा रस आहे. आध्यात्मिक संस्कृतीच्या बाबतीतही बुद्धाखेरीज भगवान शिव, सरस्वती, कुबेर आदी देवताही जपानमध्ये अनुक्रमे दायकोकुतेन, बेंझातेन, बिशामोन आदी नावांनी असल्याचे दिसते.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाने जपानमधील दहाहून अधिक शैक्षणिक संस्था व विद्यापीठांसमवेत सामंजस्य करारान्वये शैक्षणिक व संशोधनपर सहकार्य संबंध प्रस्थापित केले आहेत. या परिषदेमुळे विद्यापीठ आणि जपान यांच्यामध्ये ज्ञानसंवर्धनासह आता आध्यात्मिक, सांस्कृतिक संबंधही अधिक दृढ होण्यास बळ मिळेल.'

प्रमुख उपस्थितांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी इंडियन जेएसपीएस अल्युम्नाय असोसिएशनचे (आयजेएए) अध्यक्ष प्रा. डी. शक्ती कुमार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी सादळे यांनी आभार मानले.

### शालेय विद्यार्थ्यांसाठी आज विशेष कार्यक्रम

■ या उद्घाटनानंतर ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जी.डी. यादव यांचे 'दि नेट झिरो गोल अँड सस्टेनॅबिलिटी' या विषयावर बीजभाषण झाले. त्यानंतर चर्चासत्रांमध्ये प्रा. ओसामु साकाई, इंद्रदेव समजदार, योशिरो अझुमा, जया सीलम, सचिनकुमार भालेकर, नकुल मैती यांची व्याख्याने झाली. जपान सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी एजन्सीने प्रात्यक्षिके सादर केली. सायंकाळी जपानी पाहुण्यांसाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. दरम्यान, उद्या, शनिवारी सकाळी ११ वाजता या परिषदेमध्ये कोल्हापुरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष 'ईग्नाइटिंग माईंड्स ऑफ चिल्ड्रेन' या विशेष कार्यक्रम होणार आहे.

### कृत्रिम भावनांच्या फंदात पडू नका

■ डॉ. सहस्त्रबुद्धे म्हणाले, 'कृत्रिम बुद्धिमत्तेचे समर्थन एकवेळ ठीक, मात्र कृत्रिम भावनांच्या मात्र फंदात पडू नका. त्यातून असह्य एकटेपणा निर्माण होईल, जो नेहमीच मानवतेच्या प्रगतीला खीळ घालेल.

- 9 SEP 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जपानच्या चांद्रयान मोहिमेसाठी भारताचे सहकार्य

## डॉ. विनय सहस्त्रबुद्धे : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेला प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

जपानच्या 'ल्युपेक्स' चांद्रयान मोहिमेसाठी जपानी अवकाश संस्थेला भारतीय इस्रो संस्था सहकार्य करणार आहे. पुढील काळात दोन्ही देशातील ज्ञानसंबंध अधिक दृढ होण्याच्या दृष्टीने ही परिषद अमूल्य भूमिका बजावेल. याद्वारे दोन्ही देशात प्रगतीच्या अनेक संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित १३ व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

शुक्रवारी शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात तीन दिवसीय परिषदेचे उद्‌घाटन झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. जी. डी. यादव, जपानचे मुंबईतील कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहारी यासुकाता, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात भारत-जपान विज्ञान व आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेत बोलताना डॉ. विनय सहस्रबुद्धे. सोबत अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, प्रा. डी. शक्तीकुमार, पद्मश्री डॉ. जी. डी. यादव, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, जपानचे मुंबईतील कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहारी यासुकाता, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. शिवाजी सादळे.

डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, भारत आणि जपान यांच्यामध्ये भगवान बुद्धांच्या काळापासून आध्यात्मिक संबंध प्रस्थापित झाले आहेत.उभय देशामध्ये केवळ वाणिज्य-व्यापारविषयकच नव्हे, तर सांस्कृतिक आणि ज्ञानाचे बहुस्तरीत संबंधही निर्माण झाले.

जपानचे मुंबईतील कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहारी यासुकाता म्हणाले, भारत हा आर्थिक तसेच सांस्कृतिकदृष्ट्याही जपानचा महत्त्वाचा भागीदार आहे. जपानमध्ये बुद्धांसह भगवान शिव, सरस्वती, कुबेर आदी देवताही दायकोकुतेन, बेंझातेन, बिशामोन आदी नावांनी असल्याचे सांगितले.

जपानमधील भारताचे राजदूत सिबी जॉर्ज, जपान सोसायटी फॉर दि प्रमोशन ऑफ सायन्स (जेएसपीएस) या संस्थेचे अध्यक्ष सुजीनो सुयोशी यांनी ऑनलाईन परिषदेत सहभाग घेतला. भारत-जपान यांचे सहसंबंध दृढ होण्याच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची ठरेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने जपानमधील दहाहून अधिक शैक्षणिक संस्था व विद्यापीठांसमवेत शैक्षणिक व संशोधनपर सहकार्य संबंध प्रस्थापित केले आहेत.

साडेतीनशेहून अधिक शोधनिबंधांच्या स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी सादळे यांनी आभार मानले. यावेळी मंचावर इंडियन जेएसपीएस अल्युम्नाय असोसिएशनचे (आयजेएए) अध्यक्ष प्रा. डी. शक्ती कुमार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार उपस्थित होते.

### शालेय विद्यार्थ्यांसाठी आज विशेष कार्यक्रमाचे आयोजन

शनिवार ९ रोजी सकाळी ११ वाजता शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष 'ईग्नाइटिंग माईड्स ऑफ चिल्ड्रेन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

### 'बुद्धांचा ज्ञानसंदेश आत्मसात करा'


भगवान बुद्धांनी दिलेले 'स्वयंप्रकाशित व्हा' व 'तमसो मा ज्योतिर्गमय' हे दोन्ही संदेश ज्ञानाशी निगडित आहेत. समूहशक्तीने विज्ञान, तंत्रज्ञान अंगिकारल्यास प्रगतीच्या वाटा निर्माण होतात. बुद्धांचा हा ज्ञानसंदेश आत्मसात करण्याचे आवाहन डॉ. सहस्रबुद्धे यांनी केले.

### सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम

ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. जी. डी. यादव यांचे 'दि नेट झिरो गोल अँड सस्टेनेबिलिटी' विषयावर बीजभाषण झाले. प्रा. हिरोफुमी यामादा यावेळी अध्यक्षस्थानी होते. दिवसभर विविध चर्चासत्रांमध्ये प्रा. ओसामु साकाई, प्रा. इंद्रदेव समजदार, प्रा. योशिरो अझुमा, डॉ. जया सीलम, डॉ. सचिनकुमार मालेकर, डॉ. नकुल मैती यांची व्याख्याने झाली. जपान सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी एजन्सी (जेएसटी) यांच्याकडून प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

लोकसत्ता

# भारत-जपानमधील सहसंबंध ज्ञानाधारित आवश्यक -डॉ. विनय सहस्रबुद्धे




भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेत बोलताना डॉ. विनय सहस्रबुद्धे.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** भारत आणि जपान या उभय देशांमधील सहसंबंध हे ज्ञानाधारित असावेत. त्याद्वारे दोन्ही देशांमध्ये प्रगतीच्या अनेकविध संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित १३व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्ह अंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेचे डॉ. सहस्रबुद्धे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. जी.डी. यादव, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, भारत आणि जपान यांच्यामध्ये भगवान बुद्धाच्या काळापासून आध्यात्मिक संबंध प्रस्थापित झाले आहेत. अगदी जपानच्या 'ल्युपेक्स' या चांद्रयान मोहिमेसाठी जपानी अवकाश संस्थेशी इस्रोने सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. असे ज्ञानसंबंध यापुढील काळात अधिक दृढ होण्याच्या दृष्टीने ही परिषद अमूल्य भूमिका बजावेल.

जपानचे मुंबईतील कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहारी यासुकाता म्हणाले, भारत हा आर्थिक तसेच सांस्कृतिकदृष्ट्याही जपानचा महत्त्वाचा भागीदार आहे. उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने जपानी कंपन्यांना भारतात मोठा रस असून नजीकच्या कालखंडात भारतात जपानी गुंतवणुकीचा ओघ मोठ्या प्रमाणात येऊ लागेल. आध्यात्मिक संस्कृतीच्या बाबतीतही बुद्धाखेरीज भगवान शिव, सरस्वती, कुबेर आदी देवताही जपानमध्ये अनुक्रमे दायकोकुतेन, बेंझातेन, बिशामोन आदी नावांनी असल्याचे दिसते.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. डी. बी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठात जपानी भाषा व संस्कृती परिचयाच्या दृष्टीने उपक्रम वृद्धी करण्यात येईल.

- 9 SEP 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतात शिका, जाताना 'भारतीयत्व' सोबत न्या

## डॉ. विनय सहस्रबुद्धे : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांशी संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारतातून शिकून परतताना थोडासा भारत आणि भारतीयत्व आपल्यासोबत मायदेशी घेऊन जा, असे आवाहन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात शिकणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना केले.

विद्यापीठात आयोजित भारत-जपान आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेनिमित्त आलेल्या डॉ. सहस्रबुद्धे यांनी विद्यापीठात विविध अभ्यासक्रमांना प्रविष्ट झालेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी-विद्यार्थिनींशी संवाद साधला.

ते म्हणाले, भारत हा अत्यंत सहिष्णू वृत्तीचा देश असून प्रेमळ व शांतिप्रिय आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय



शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांना प्रविष्ट झालेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी-विद्यार्थिनींशी डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी शुक्रवारी संवाद साधला.यावेळी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी येथून परतताना हा भारत कायमस्वरूपी आपल्या हृदयात जपून ठेवावा.

डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी तसेच महाराष्ट्र व भारताच्या इतिहासाविषयी सर्व विद्यार्थ्यांनी निश्चितपणे जाणून घेण्यास प्राधान्य द्यावे. शिवाची विद्यापीठाच्या ग्रंथालयात महाराजांविषयी अनेक इंग्रजी ग्रंथ आहेत, त्यांचे वाचन करून महाराजांच्या कार्यकर्तृत्वाविषयी त्यांनी आपल्या देशबांधवांनाही अवगत करावे.

यावेळी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन शिंदे उपस्थित होते.

9 SEP 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसमवेत परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे. सोबत कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# भारतातून शिकून परतताना 'भारतीयत्व' सोबत न्या

## आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना डॉ. सहस्रबुद्धे यांचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतातून शिकून परतताना थोडासा भारत व भारतीयत्व सोबत मायदेशी घेऊन जा, असे आवाहन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात १३ व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्ह अंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेचे उद्घाटक म्हणून डॉ. सहस्रबुद्धे शिवाजी विद्यापीठात आले होते. यावेळी विविध अभ्यासक्रमांना प्रविष्ट झालेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

महाराष्ट्र व भारताच्या इतिहासाविषयी सर्व विद्यार्थ्यांनी निश्चितपणे जाणून घेण्यास प्राधान्य द्यावे. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस.

सकाळ

# भारतीयत्व मायदेशी घेऊन जा : सहस्त्रबुद्धे

## विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना आवाहन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : 'भारतातून शिकून परतताना थोडासा भारत आणि भारतीयत्व आपल्यासोबत मायदेशी घेऊन जा', असे आवाहन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी आज येथे शिवाजी विद्यापीठात शिकणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना केले.

डॉ. सहस्त्रबुद्धे म्हणाले, 'भारत हा अत्यंत सहिष्णू वृत्तीचा देश असून प्रेमळ व शांतिप्रिय आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांनी येथून परतताना हा भारत कायमस्वरुपी आपल्या हृदयात जपून ठेवावा. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी तसेच महाराष्ट्र व भारताच्या इतिहासाविषयी सर्व विद्यार्थ्यांनी निश्चितपणे जाणून घेण्यास प्राधान्य द्यावे. विद्यापीठाच्या ग्रंथालयात शिवाजी महाराजांविषयी अनेक इंग्रजी ग्रंथ आहेत, त्यांचे वाचन करून त्यांच्या कार्यकर्तृत्त्वाविषयी त्यांनी आपल्या देशबांधवांनाही अवगत करावे. पुढील पिढीच्या विद्यार्थ्यांनाही भारतात शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करावे.'


या वेळी विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाचा परिसर अतिशय आल्हाददायक व अभ्यासाला पोषक असल्याचे सांगितले. कोल्हापूरचे लोक अत्यंत प्रेमळ व सहकार्यशील असून येथील मसालेदार खाद्यसंस्कृती अतिशय लज्जतदार असल्याचे सांगितले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, आंतरराष्ट्रीय कक्षाचे समन्वयक डॉ. शिवाजी सादळे, डॉ. जे.बी. यादव, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, संजय परमणे, आदी उपस्थित होते.

- 9 SEP 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठाचे हरित पाऊल : प्लास्टिक व कचरामुक्त कॅम्पसवर भर

# पर्यावरण संवर्धनाचे कृतिशील प्रारूप

कोल्हापूर : रोज सुमारे १ लाख लिटर सांडपाण्याचा पुनर्वापर, सौरऊर्जेचा वापर, घनकचरा व्यवस्थापन आदींच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने हरित पावले टाकत पर्यावरण रक्षणाला बळ दिले आहे. शाश्वत आणि पर्यावरणास अनुकूल पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्यातून विद्यापीठाचा परिसर कचरा कमी करणारे आणि पर्यावरण रक्षण करणारा हरित परिसर (ग्रीन कॅम्पस) बनला आहे.




बिग स्टोरी

संतोष मिठारी

### पाण्याबाबत स्वावलंबी

२०१४-१५ च्या दुष्काळाचा सामना केल्यानंतर विद्यापीठाने स्वावलंबी होण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग सुरू केले. सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर २०१७ मध्ये विद्यापीठ पाण्यासाठी स्वावलंबी झाले. त्यानंतरही रेन वॉटर हार्वेस्टिंग सुरू ठेवले. सध्या कॅम्पसमध्ये २ तलाव, १० विहिरी, २३ शेततळे हे मूलभूत पाण्याचे साठे असून, त्याद्वारे ३३ कोटी लिटर पाणी साठवले जात आहे. त्यातून पाण्याची गरज पूर्ण होत आहे.



### रोज १ लाख १० लिटर सांडपाण्याचा पुनर्वापर

सांडपाणी पुनर्वापरासाठी विद्यापीठाने चार एसटीपी प्लांट बांधले आहेत. मुलींच्या वसतिगृहाजवळील प्लांट रोज ६० हजार लिटर, तर पाच बंगला आणि मुलांच्या वसतिगृहाजवळील प्लांट ५० हजार लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. ते परिसरातील झाडांसाठी वापरले जाते. डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या वसतिगृहाजवळील प्लांटमध्ये प्रक्रिया केलेले पाणी ३७ एकरमध्ये पसरलेल्या बागांसाठी वापरण्यात येते. डीआरडीओने डिझाईन केलेला ९ हजार लिटर प्रतिदिन क्षमतेचा बायो-डायजेस्टर प्लांट मुख्य प्रशासकीय इमारतीच्या मागे बसविला आहे. त्याच्या पाण्याचा वापर राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहाच्या आजूबाजूला लावलेली झाडे आणि नारळाच्या बागेसाठी होतो.

### समृद्ध जैवविविधता, स्वच्छ हवेचा पुरवठा

कॅम्पसची जैवविविधता समृद्ध करण्यासाठी विद्यापीठ २०१२ पासून प्रामुख्याने दरवर्षी स्थानिक प्रजातींची झाडे लावत आहे. २०१९ च्या अहवालानुसार कॅम्पसमध्ये सुमारे १३, ५०० झाडे चांगली वाढली असून, २० हजार नवीन झाडे लावली आहेत. वनस्पतीशास्त्र विभागाने ४० एकर जागेत लीड बोटॅनिकल गार्डन विकसित केले आहे. त्यामुळे शहराच्या इतर भागांच्या तुलनेत कॅम्पसमध्ये हवा स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त होण्यास मदत होत आहे.

### १७ लाख ८८ हजारांची सौरऊर्जेतून बचत

विद्यापीठ विद्युत उर्जेसाठी स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्नशील आहे. याअंतर्गत विद्यापीठाने एकूण १८० किलोवॅट क्षमतेच्या रूफ टॉप ग्रिड कनेक्टेड एसपीपीजी सिस्टीम स्थापित केल्या आहेत. त्या मुख्य प्रशासकीय इमारत, रसायनशास्त्र विभागाच्या छतावर आहेत. त्या संयंत्रातून २ लाख ३२ हजार ५४८ युनिट ऊर्जेची निर्मिती होते. त्याने दरवर्षी १७ लाख ८८ हजार ४६० रुपयांची बचत होत आहे. विद्यापीठ परिसरातील विहिरीतून पाणी उपसा करण्यासाठी सौरजलपंपांचा वापर केला जात आहे. विद्यार्थी वसतिगृह, विद्यार्थी भवन पाच बंगले, कुलगुरू आणि प्र-कुलगुरू निवासस्थान, अतिथीगृहे याठिकाणी सोलर वॉटर हिटर्सद्वारे रोज ५७ हजार लिटर पाणी गरम केले जाते. त्यामुळे दरवर्षी २२ लाख ८० हजार रुपयांची बचत होत आहे.

### प्लास्टिकचा कमी, तर कागदाचा पुनर्वापर

प्लास्टिकचा वापर कमी केला आहे. दरमहा ३१०८ किलो घनकचरा तयार होतो. त्याचे कंपोस्टिंग खतामध्ये रूपांतर केले जाते. ते बागांसाठी वापरले जाते. कागदाचा ४८४.३४ किलो कचरा पेपरमिलमध्ये पुनर्वापरासाठी पाठविण्यात येतो. विविध बिल्डिंग ब्लॉक्सद्वारे विल्हेवाट लावलेल्या ई-कचऱ्याचे एकूण प्रमाण ६६.०८ किलो आहे. आरोग्य केंद्रातील वैद्यकीय कचऱ्याची भारतीय मेडिकल कौन्सिलने परिभाषित केलेल्या निकषांनुसार विल्हेवाट लावली जाते.

> शिवाजी विद्यापीठाचा कॅम्पस हा सर्क्युलर इकॉनॉमीचे मॉडेल व्हावे आणि ते समाजासाठी आदर्श ठरावे, यादृष्टीने काही हरित उपक्रमांची पावले टाकली आहेत. कॅम्पसमध्ये तयार होणाऱ्या विविध स्वरूपातील कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर केला जात आहे. भविष्यात हरित ऊर्जेचा वापर, प्लास्टिक आणि कचरामुक्त कॅम्पस करण्यावर भर राहणार आहे. कॅम्पस ग्रीन राखण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली जाणार आहे.
> **-डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

### सात एकरवरील बागेला ठिबक सिंचन

कॅम्पसमध्ये सात एकरांवर विकसित झालेल्या आंबा, सपोटा, नारळाच्या बागेला ठिबक सिंचन पद्धतीने पाणीपुरवठा केला जातो. सुशोभीकरणासाठी विकसित केलेले लॉन आणि इतर उद्यान क्षेत्रांना स्प्रिंकलर आणि रेन गनद्वारे पाणी दिले जाते. रिव्हर्स ऑस्मोसिस प्लांटचे नाकारलेले पाणी ठिबक सिंचनासह २०० नारळ झाडांच्या बागेसाठी आणि मुलांच्या वसतिगृहातील बागेसाठी वापरले जाते.



रेन वॉटर हार्वेस्टिंगद्वारे पाण्याची साठवण.

### वसतिगृहांतील मेससाठी बायोगॅसचा वापर

टाकाऊ अन्न व्यवस्थापनासाठी कॅम्पसच्या पूर्व आणि पश्चिम बाजूला दोन बायोगॅस संयंत्रे सुरू केली आहेत. तंत्रज्ञान विभागाजवळील प्लांटमधून रोज ८ घनमीटर, तर डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका विद्यार्थी भवनाजवळील प्लांटमधून २४ घनमीटर गॅसची निर्मिती होते. त्याचा वापर त्या-त्या परिसरातील वसतिगृहातील मेसमध्ये केला जातो. त्यातून दरमहा एकूण ३१ हजार रुपयांची बचत होते.





विद्यापीठातील सौरऊर्जा प्रकल्प

पुण्यनगरी

# 'इस्त्रो'चे उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा सोमवारी विद्यापीठात

कोल्हापूर : भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे (इस्त्रो) उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा आणि शास्त्रज्ञ डॉ. आर. श्रीविध्या या दोन वरिष्ठ शास्त्रज्ञांची येत्या सोमवारी (दि. ११) शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागांतर्गत 'मीट दि सायंटिस्ट' हा उपक्रम नियमितपणे आयोजित केला जातो. या अंतर्गत येत्या सोमवारी सकाळी ११.३० वाजता डॉ. शर्मा यांचे चांद्रयान-३' या विषयावर आणि दुपारी १२.३० वाजता डॉ. आर. श्रीविध्या यांचे 'आदित्य एल-१' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तरी जिज्ञासू विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. केशव राजपुरे यांनी केले आहे.

पुढारी

# ध्वनी-पार्श्वसंगीताने चित्रपटाच्या सौंदर्यात भर

## ऐश्वर्य मालगावे; पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ध्वनी संयोजन व पार्श्वसंगीत यांच्या एकत्रित परिणामामुळे चित्रपटाच्या सौंदर्यात भर पडते, असे मत प्रसिद्ध संगीतकार ऐश्वर्य मालगावे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात आयोजित विशेष व्याख्यानप्रसंगी ते 'ध्वनी-पार्श्व संगीताचा चित्रपटातील वापर आणि तांत्रिक महत्त्व' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी व्हिडीओ एडिटर शेखर गुरव होते.

मालगावे म्हणाले, ध्वनी आणि पार्श्वसंगीत चित्रपटातून वजा करता येत नाही. अलीकडे चित्रपटात विविध प्रकारचे साऊंड इफेक्ट वापरून चित्रपट अधिकाधिक परिणामकारक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये पार्श्वसंगीतात बरेचसे नवे बदल होत असून प्रेक्षकांकडून त्याला प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटांचा प्रभाव दीर्घकाळ टिकून ठेवण्यासाठी पार्श्वसंगीताची मदत होते. नव्या तंत्रज्ञानामुळे काम सोपे झाले असले तरी त्यासाठी आवश्यक असणाऱ्या तांत्रिक कौशल्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही, असेही त्यांनी नमूद केले. मल्हार जोशी यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात मार्गदर्शन करताना ऐश्वर्य मालगावे.**

सकाळ

# 'इस्रो'चे उपसंचालक डॉ. शर्मा यांचे विद्यापीठात सोमवारी व्याख्यान

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे (इस्रो) उपसंचालक डॉ. एस.व्ही. शर्मा आणि शास्त्रज्ञ डॉ. आर. श्रीविध्या या दोन वरिष्ठ शास्त्रज्ञांची सोमवारी (ता. ११) सकाळी साडेअकरा वाजता शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्याने होणार आहेत. विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागांतर्गत 'मीट दि सायंटिस्ट' हा उपक्रम नियमितपणे आयोजित केला जातो. या अंतर्गत येत्या सोमवारी इस्रोचे उपसंचालक डॉ. एस.व्ही. शर्मा यांचे 'चांद्रयान-३' या विषयावर आणि दुपारी साडेबारा वाजता इस्रोच्या शास्त्रज्ञ डॉ. आर. श्रीविध्या यांचे 'आदित्य एल-१' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. जिज्ञासू विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. केशव राजपुरे यांनी केले आहे.

तरुण भारत

# विद्यापीठात सोमवारी इस्त्रोचे उपसंचालक डॉ. शर्मा यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभाच्या 'मीट दि सायंटिस्ट' उपक्रमा अंतर्गत सोमवार दि. ११ रोजी सकाळी इस्रोचे उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा यांचे 'चांद्रयान-३' विषयावर तर दुपारी इस्रोच्या शास्त्रज्ञ डॉ. आर. श्रीविध्या या 'आदित्य एल-१' विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. याचा लाभ घेण्याचे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. केशव राजपुरे यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाला 'बार्टी'चे प्रशिक्षण केंद्र मंजूर

**कोल्हापूर :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठाला मंजूर झाले.

अनुसूचित जातीच्या उमेदवारांना बँक, रेल्वे, एलआयसी व तत्सम स्पर्धा परीक्षेच्या निःशुल्क पूर्वप्रशिक्षणासाठी १० सप्टेंबर, २०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागवले आहेत. त्यासाठी बार्टीच्या संकेतस्थळावर अर्ज भरणे अनिवार्य आहे. याबाबत प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाणार आहे. शिवाजी विद्यापीठ व बार्टी, पुणे यांच्यामध्ये स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र चालवण्याबाबत सामंजस्य करार झाला असून, त्यानुसार हे केंद्र मंजूर झाले आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या सहकार्याने ही कार्यवाही पूर्ण झाली आहे. अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर ही संधी उपलब्ध करून देता आली, याचा आनंद आहे, अशी भावना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी व्यक्त केली.

लोकमत

# आफ्रिकन जर्नलच्या संपादकीय मंडळावर राहुल मानेंची निवड



कोल्हापूर : ईल्सवेअर पब्लिशिंग ग्रुपच्या साउथ आफ्रिकन जर्नल ऑफ केमिकल इंजिनिअरिंगच्या संपादकीय मंडळावर शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. राहुल माने यांची सदस्य म्हणून निवड झाली. भारतातील तीन तज्ज्ञ सदस्य या मंडळावर आहेत.

यापैकी दोघे हे आयआयटीमधील तज्ज्ञ आहेत. डॉ. माने हे महाराष्ट्रातून एकमेव सदस्य म्हणून निवडले गेले. साउथ आफ्रिकन जर्नल ऑफ केमिकल इंजिनिअरिंग संशोधन क्षेत्रातील नियतकालिक आहे.

या संपादकीय मंडळावर काम करणे प्रतिष्ठेचे मानले जाते. त्यामुळे ही निवड आनंददायी आहे. या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचावण्याची संधी आहे.

**- प्रा. डॉ. राहुल माने, रसायनशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ**

डॉ. माने हे औद्योगिक रसायनशास्त्र विभागात गत चौदा वर्षांपासून सहायक प्राध्यापक म्हणून काम करत आहेत. आतापर्यंत त्यांचे ८५ हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांना डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी यंग सायंटिस्ट पुरस्कार मिळाला आहे.

लोकमत

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC
(2021) with CGPA 3.52

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## एम. बी. ए. (Distance) करिता प्रवेशाची सुवर्णसंधी

शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करिता एम. बी. ए. (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या प्रवेश परीक्षेसाठी (Entrance Exam) रिक्त जागांकरिता ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहे. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **दि. १५ सप्टेंबर २०२३** आहे.

## रिक्त जागांकरिता प्रवेश परीक्षा दि. १७ सप्टेंबर २०२३

**एम. बी. ए. (Distance) अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्ट्ये :**
- AICTE, New Delhi, UGC-DEB मान्यताप्राप्त अभ्यासक्रम
- अनुभवी विषयतज्ज्ञ व त्यांनी लिहिलेले Study Material
- शंकानिरसनासाठी ऑनलाईन संपर्क सत्रे
- विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता ३ जिल्ह्यांत एकूण ६ परीक्षा केंद्रे
- एकाच वेळी दोन अभ्यासक्रमांना प्रवेशाची संधी
- कोणतेही दोन ऐच्छिक विषय निवडण्याची मुभा
- आपली नोकरी / व्यवसाय सांभाळून उच्च शिक्षणाची संधी

**एम.बी.ए. (Distance) करिता ऐच्छिक विषय :**
- Human Resource Management
- Financial Management
- Marketing Management
- Production and Operations Management
- International Business

**पात्रता :**
- विद्यापीठामार्फत घेतली जाणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणारी व मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विद्याशाखेची पदवी (५०% खुला प्रवर्ग / ४५% आरक्षित प्रवर्ग) पूर्ण केलेली व्यक्ती.

अर्ज करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा...

अधिक माहितीसाठी संपर्क :
http://www.unishivaji.ac.in
cde_mba@unishivaji.ac.in

ठिकाण : कोल्हापूर
दिनांक : ०९-०९-२०२३
जा. क्र. सीडीओई २७०

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

पुढारी

Estd 1962
"A++"Accredited by
NAAC(2021) WITH CGPA3.52

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## एम. बी. ए. (Distance) करिता प्रवेशाची शेवटची संधी

शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करिता एम. बी. ए. (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या प्रवेश परीक्षेसाठी (Entrance Exam) रिक्त जागांकरिता ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहेत. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. १५ सप्टेंबर २०२३ आहे.

**रिक्त जागांकरिता प्रवेश परीक्षा दिनांक : १७ सप्टेंबर २०२३**

**एम. बी.ए. (Distance) अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्ट्ये**
- AICTE, New Delhi, UGC- DEB मान्यताप्राप्त अभ्यासक्रम
- अनुभवी विषयतज्ज्ञ व त्यांनी लिहिलेले Study Material
- शंका निरसनासाठी ऑनलाईन संपर्क सत्रे
- विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता ३ जिल्ह्यांत एकूण ६ परीक्षा केंद्रे
- एकाच वेळी दोन अभ्यासक्रमांना प्रवेशाची संधी
- कोणतेही दोन ऐच्छिक विषय निवडण्याची मुभा
- आपली नोकरी/ व्यवसाय सांभाळून उच्च शिक्षणाची संधी

**एम. बी. ए. (Distance) करिता ऐच्छिक विषय :**
- Human Resource Management
- Financial Management
- Marketing Management
- Production and Operations Management
- International Business

**पात्रता :**
- विद्यापीठामार्फत घेतली जाणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणारी व मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विद्याशाखेची पदवी (५०% खुला प्रवर्ग/ ४५% आरक्षित प्रवर्ग) पूर्ण केलेली व्यक्ती.

अर्ज करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा..

अधिक माहितीसाठी संपर्क :
http:// www.unishivaji.ac.in
cde_mba@unishivaji.ac.in
ठिकाण : कोल्हापूर
दिनांक : ०१/०९/२०२३
जा. क्र. सीडीओई/२७०

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

### युवक युवतींना नोकरीची संधी व कौशल्य वृध्दिंगत करणारे प्रमाणपत्र अभ्यासक्रम

* योग व निसर्गोपचार –शैक्षणिक पात्रता: १० वी पास (१२ महिने), शैक्षणिक शुल्क रु. १०,०००/–
* योग शिक्षक –शैक्षणिक पात्रता: १० वी पास (नऊ महिने) शैक्षणिक शुल्क रु. ५,०००/–

### सहा महीने कालावधीचे अभ्यासक्रम

* बालवाडी शिक्षक शिक्षण–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. १,०००/–, पुस्तक/साहित्य शुल्क रु. १३०/–
* प्राथमिक योग, शैक्षणिक पात्रता : १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/–

### चार महीने कालावधीचा अभ्यासक्रम

* रोपवाटीका व उद्यान कौशल्य–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. १,०००/–

### तीन महीने कालावधीचे अभ्यासक्रम

* व्यक्तिमत्व विकास–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/–
* इव्हेंट मॅनेजमेंट–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/–
* रेडिओ जॉकी कम प्रोग्रॅमर– शैक्षणिक पात्रता: १२ वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५०००/–
* औषधी वनस्पतींची ओळख, शैक्षणिक पात्रता: ७ वी पास शैक्षणिक शुल्क रु. १०००/–
* सुत्रसंचालन व निवेदन– शैक्षणिक पात्रता:१२ वी पास (४५ दिवस) शैक्षणिक शुल्क रु. २,०००/–
* मोडी लिपी, शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/– (१ महिना)

टिप : १. वरील सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेश शुल्क रु. २५/– व माजी विद्यार्थी शुल्क रु. २५/– भरावे लागतील.
२. वरील अभ्यासक्रमांची माहिती पुस्तिका (Syllabus) शिवाजी विद्यापीठ सेंट्रल कंझ्युमर्स स्टोअर्स (अनेक्स बिल्डिंग) येथे विक्रीस उपलब्ध आहे.

**प्रवेशाची अंतिम तारीख: दि. २५/०९/२०२३**

प्रवेशासाठी व अधिक माहितीसाठी संपर्क साधा
प्रा. (डॉ.) आर. जी. पवार, संचालक
दुरध्वनी : ०२३१–२६०९१५०/५१

दि. ०९/ ०९/२०२३

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

### युवक युवतींना नोकरीची संधी व कौशल्य वृध्दिंगत करणारे प्रमाणपत्र अभ्यासक्रम

* योग व निसर्गोपचार –शैक्षणिक पात्रता: १० वी पास (१२ महिने), शैक्षणिक शुल्क रु. १०,०००/-
* योग शिक्षक –शैक्षणिक पात्रता: १० वी पास (नऊ महिने) शैक्षणिक शुल्क रु. ५,०००/-

### सहा महीने कालावधीचे अभ्यासक्रम

* बालवाडी शिक्षक शिक्षण–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. १,०००/-, पुस्तक/साहित्य शुल्क रु. १३०/-
* प्राथमिक योग, शैक्षणिक पात्रता : १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/-

### चार महीने कालावधीचा अभ्यासक्रम

* रोपवाटीका व उद्यान कौशल्य–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. १,०००/-

### तीन महीने कालावधीचे अभ्यासक्रम

* व्यक्तिमत्व विकास–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/-
* इव्हेंट मॅनेजमेंट–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/-
* रेडिओ जॉकी कम प्रोग्रॅमर– शैक्षणिक पात्रता: १२ वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५०००/-
* औषधी वनस्पतींची ओळख, शैक्षणिक पात्रता: ७ वी पास शैक्षणिक शुल्क रु. १०००/-
* सुत्रसंचालन व निवेदन– शैक्षणिक पात्रता:१२ वी पास (४५ दिवस) शैक्षणिक शुल्क रु. २,०००/-
* मोडी लिपी, शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/- (१ महिना)

टिप : १. वरील सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेश शुल्क रु. २५/- व माजी विद्यार्थी शुल्क रु. २५/- भरावे लागतील.
२. वरील अभ्यासक्रमांची माहिती पुस्तिका (Syllabus) शिवाजी विद्यापीठ सेंट्रल कंझ्युमर्स स्टोअर्स (अनेक्स बिल्डिंग) येथे विक्रीस उपलब्ध आहे.

**प्रवेशाची अंतिम तारीखः दि. २५/०९/२०२३**

प्रवेशासाठी व अधिक माहितीसाठी संपर्क साधा
प्रा. (डॉ.) आर. जी. पवार, संचालक
दुरध्वनी : ०२३१–२६०९१५०/५१

दि. ०९/ ०९/२०२३

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

सकाळ

Estd. 1962
Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## एम.बी.ए. (Distance) करिता प्रवेशाची शेवटची संधी

शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करिता एम.बी.ए. (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या प्रवेश परिक्षेसाठी (Entrance Exam) रिक्त जागांकरिता ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहे. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि.१५ सप्टेंबर २०२३ आहे.

**रिक्त जागांकरिता प्रवेश परीक्षा दिनांक: २३ सप्टेंबर २०२३**

**एम.बी.ए. (Distance) अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्ट्ये :**

- AICTE, New Delhi, UGC-DEB मान्यताप्राप्त अभ्यासक्रम
- अनुभवी विषयतज्ज्ञ व त्यांनी लिहिलेले Study Material
- शंकानिरसनासाठी ऑनलाईन संपर्क सत्रे
- विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता ३ जिल्ह्यांत एकूण ६ परीक्षा केंद्रे
- एकाच वेळी दोन अभ्यासक्रमांना प्रवेशाची संधी
- कोणतेही दोन ऐच्छिक विषय निवडण्याची मुभा
- आपली नोकरी/ व्यवसाय सांभाळून उच्च शिक्षणाची संधी

**एम.बी.ए. (Distance) करिता ऐच्छिक विषय:**

- Human Resource Management
- Financial Management
- Marketing Management
- Production and Operations Management
- International Business

**पात्रता:**

- विद्यापीठामार्फत घेतली जाणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणारी व मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विद्याशाखेची पदवी (५०% खुला प्रवर्ग / ४५% आरक्षित प्रवर्ग) पूर्ण केलेली व्यक्ती.

अर्ज करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा...

अधिक माहितीसाठी संपर्क:
http://www.unishivaji.ac.in
cde_mba@unishivaji.ac.in

ठिकाण: कोल्हापूर
दिनांक : ०९/०९/२०२३
जा.क्र. सीडीओई/२७०

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव